आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१८ सप्टेंबर २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारताचा जीडीपी वाढीचा वास्तविक दर चालू आर्थिक वर्षात ७ टक्के राहील असा मूडीज या मानांकन संस्थेचा अंदाज

- महाराष्ट्रातल्या चौक-कर्जत रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला रेल्वेची मंजुरी

- तृणमूल काँग्रेस पक्षाचं नाव, आणि चिन्ह वापरायला पक्षाच्या दोन्ही गटांना मनाई

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धांमधे महिला क्रिकेटमध्ये जपानचा धुव्वा उडवून भारताचा उपांत्य फेरीत प्रवेश/ उद्घाटन सोहळ्यात नेमबाज मनू भाकर आणि गोळाफेकपटू ताजिंदरपाल सिंह तूर भारताचे ध्वजवाहक

**<><><><><>**

भारताच्या जीडीपीचा वास्तविक वृद्धीदर चालू आर्थिक वर्षात ७ टक्के राहील, असा अंदाज मूडीज या जागतिक मानांकन संस्थेनं वर्तवला आहे. याआधी हा दर ६ टक्के राहील, असा अंदाज या संस्थेनं वर्तवला होता. पश्चिम आशियातल्या युद्धपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, भारतीय अर्थव्यवस्थेच्या लवचिकतेमुळे हा दर १ टक्क्याने वाढल्याचं संस्थेचं म्हणणं आहे. जी-२०च्या सर्व सदस्य देशांपेक्षा भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचंही मूडीजनं म्हटलं आहे. २०२६च्या पहिल्या तिमाहीत भारताचा जीडीपीचा वास्तविक वृद्धिदर मागच्या वर्षीच्या या कालावधीच्या तुलनेत वाढून ८ पूर्णांक २ दशांश टक्के झाला आहे. गेल्या वर्षी हा दर ७ पूर्णांक ३ दशांश टक्के इतका होता. वाढती गुंतवणूक, पायाभूत सुविधांवर सरकारने केलेला खर्च, खासगी गुंतवणूक क्षेत्रातलं परिवर्तन आणि सेवा क्षेत्राच्या बळकटीकरणामुळे ही वाढ झाल्याचं मूडीजनं नमूद केलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीला २५ वर्षं पूर्ण होत असून, त्यानिमित्त राज्यात सेवा संकल्प अभियान सुरु झालं आहे. सेवा आणि सुशासन या तत्वावर

आधारित या काळातले महत्त्वाचे निर्णय, प्रकल्प आणि विधायक घडामोडींचा आढावा आपण आजपासून घेणार आहोत. आज ऐकूया बँकींग क्षेत्रातल्या सुधारणांविषयी माहिती..

- - - **होल्ड- व्हॉईस कास्ट - --**

*(देशाच्या बँकींग क्षेत्रात अनेक बदल झाले. आर्थिक समावेशन, बँकांचं सक्षमीकरण आणि जुन्या कर्जांचे हिशेब बंद करणं, तसंच डिजिटल बँकिंगकडे वेगाने वाटचाल असं या काळातल्या प्रदतीचं वर्णन करता येईल. ऑगस्ट २०१४ मधे सुरु झालेल्या जनधन योजने अंतर्गत ऑगस्ट २०२६पर्यंत ५९ कोटी जनधनखाती उघडली. आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक जोडल्यामुळे लाभ हस्तांतरणासाठी ही खाती अधिक सुरक्षित झाली. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांना मजबूत करण्यासाठी विजया बँक, आणि देना बँकेचं बँक ऑफ बडोदा मधे विलिनीकरण झालं, पंजाब नॅशनल बँक, कॅनरा बँक, युनियन बँक ऑफ इंडिया, तसंच इंडियन बँकेमधे मिळून १० बँका विलीन झाल्या. बुडीत कर्ज निकाली काढून बँकांचं पुनरुज्जीवन करण्यात आलं. कर्जबुडव्यांना शिस्त लावण्यासाठी दिवाळखोरी आणि नादारी कायद्यात २०१६ मधे सुधारणा करण्यात आली. अनुत्पादक मालमत्ता कमी झाली.*

*बँकांच्या पुनरुज्जीवनासाठी ३ लाख कोटी रुपये सरकारने वेगवेगळ्या वेळी गुंतवले. युपीआय, डिजिटल लेंडींग आणि मोबाईल बँकींगमुळे व्यवहार सोपे झाले.)*

**<><><><><>**

समृद्ध, विकसित आणि कणखर भारताच्या निर्मितीत सर्व नागरिकांनी समर्पित योगदान द्यावं, असं आवाहन केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं संकल्प सेवा अभियान कार्यक्रमात बोलत होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात भारतात आमूलाग्र बदल घडून आले असून अन्न सुरक्षा, संपर्क प्रणाली आणि पायभूत सुविधा क्षेत्रात महत्त्वपूर्ण सुधारणा झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या चौक-कर्जत रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला भारतीय रेल्वेनं मंजूरी दिली आहे. यासाठी ४९७ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. राज्यात रेल्वेची क्षमता वाढवणं आणि रेल्वेचं परिचालन सुधारण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. पनवेल-चौक-कर्जत मार्गावरचा हा भाग प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी महत्त्वाचा असल्याचं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे. या भागाचं दुपदरीकरण पूर्ण झाल्यानंतर दोन्ही बाजूंनी दररोज ५ वाढीव फेऱ्या

करता येतील, अशी माहितीही रेल्वेनं दिली. याशिवाय, या दुपदरीकरणामुळे दर वर्षी १ कोटी ८३ लाख टनांपेक्षा जास्त अतिरिक्त मालवाहतूक करता येईल, असंही रेल्वेनं म्हटलं आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांचं आज दिवसभराच्या महाराष्ट्र दौऱ्यावर आगमन झालं. मुंबई विमानतळावर राज्यपाल जिष्णु देव वर्मा आणि इतरांनी त्यांचं स्वागत केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा निवासस्थानी गणपतीचं दर्शन त्यांनी घेतलं, तसंच प्रसिद्ध लालबागचा राजा मंडळाच्या गणपतीचं दर्शन घेऊन पूजा केली. कैवल्यधामतर्फे लोणावळा इथं आयोजित कार्यक्रमाला ते उपस्थित राहणार आहेत. संध्याकाळी पुण्यात गणेशोत्सवानिमित्त आयोजित पुणे फेस्टीव्हलमधे ते सहभागी होतील.

<><><><><>

केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी आज मुंबईत जूहू इथं स्वच्छ सागर, सुरक्षित सागर, या किनारा स्वच्छता अभियानात भाग घेतला. दरवर्षी सप्टेंबर महिन्यातला तिसरा शनिवार जगभरात आंतरराष्ट्रीय किनारा स्वच्छता दिवस म्हणून साजरा केला जातो.

<><><><><>

तृणमूल काँग्रेस पक्षाचं नाव, तसंच फूल आणि गवत हे चिन्ह वापरायला निवडणूक आयोगानं पक्षाच्या दोन्ही गटांना मनाई केली आहे. तसंच ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकीच्या मतदान प्रक्रियेवरूनही तृणमूल काँग्रेसचं नाव आणि चिन्ह तात्पुरतं हटवण्याचा निर्णय घेतला आहे. दोन्ही गटांच्या नेत्यांचं म्हणणं ऐकून घेतल्यानंतर आयोगानं हा अंतरिम आदेश गुरुवारी जारी केला. हा आदेश बेकायदा असल्याची टीका तृणमूल काँग्रेस ममता बॅनर्जी गटाचे नेते कल्याण बॅनर्जी यांनी केली आहे. तर अरूप रॉय यांच्या नेतृत्वातल्या गटानं या निर्णयाचं स्वागत केलं आहे. दरम्यान या दोन्ही गटांनी नावं आणि चिन्हांसाठीचे ३ पर्याय निवडणूक आयोगाकडे सोपवले आहेत.

<><><><><>

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी आपल्या २ दिवसांच्या भूतान भेटीदरम्यान आज भूतानच्या परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही नेत्यांनी भारत आणि भूतान सहकार्याच्या विविध क्षेत्रांचा तसंच परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि आंतराष्ट्रीय मुद्द्यांचा आढावा घेतला. भारत आणि भूतानमधली बहुआयामी भागीदारी अधिक बळकट करण्यात

झालेल्या प्रगतीची  दोन्ही नेत्यांनी प्रशंसा केली. भूतानच्या विकास उद्दिष्टाना आणि प्राधान्यांना भारताचा पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार जयशंकर यांनी केला. यावेळी दोन्ही नेत्यांनी विविध विकास कामांचं उद्घाटनही केलं.

<><><><><>

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय अभ्यासक्रमासाठीच्या नीट परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रीयेत संस्थात्मक बदल आवश्यक असून स्थायी संस्थात्मक बदल हाच याप्रकरणी उपाय असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. नंदन नीलकेणी यांच्या नेतृत्वाखालील समितीचा अहवाल या महिनाअखेरीपर्यंत अपेक्षित असल्याचं केंद्रसरकारने न्यायालयाला सांगितलं. नीलकेणी समिती व्यापक स्तरावर चर्चा आणि पाहणी करत आहे. राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या नवीन अद्ययावत आस्थापनेला भेट देऊ असं न्यायमूर्ती पी एस नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे  यांच्या पीठाने सांगितलं.

<><><><><>

हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड म्हणजेच एचएएल आज बंगळुरू इथं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत, स्वदेशी बनावटीचे हलके लढाऊ विमान, दोन व्यक्तींच्या क्षमतेचं तेजस विमान आणि एचटीटी- 40 हे प्राथणिक प्रशिक्षण विमान भारतीय हवाई दलाकडे सुपूर्द करणार आहे. तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम असलेल्या पवन हंस लिमिटेडकडे ध्रुव चे अत्याधुनिक हेलिकॉप्टरही सुपूर्द करणार आहे.

<><><><><>

आशियाई क्रीडा स्पर्धांमधे महिला क्रिकेटमध्ये भारतानं यजमान जपानचा धुव्वा उडवून उपांत्य फेरीत प्रवेश केला. आज निस्शिन इथं झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात भारताच्या संघानं जपानवर ८ गडी आणि ९० चेंडू राखून दणदणीत मात केली. नाणेफेक जिंकून भारतानं प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आणि जपानचा संपूर्ण संघ १९ षटकं आणि ५ चेंडूंमध्ये अवघ्या ५७ धावांवर तंबूत धाडला. श्री चरणीनं ४, शफाली वर्मानं २, तर श्रेयांका पाटील आणि दीप्ती शर्मानं प्रत्येकी एका खेळाडूला बाद केलं. त्यानंतर भारतानं केवळ ५ षटकांमध्ये २ खेळाडूंच्या मोबदल्यात ५९ धावा काढल्या आणि सामना जिंकला.

सॉफ्ट टेनिस आणि टेकबॉल या खेळांमध्येही भारताचे खेळाडू आज मैदानात उतरत आहेत.

आशियाई क्रीडा स्पर्धांचा औपचारिक उद्घाटन सोहळा उद्या होणार असून ऑलिम्पिक पदकविजेती नेमबाज मनू भाकर आणि जगज्जेता गोळाफेकपटू ताजिंदरपाल सिंह तूर हे भारताचे ध्वजवाहक असतील.

//<><><><><>//